चंद्रमोहनच्या चित्रांशी गप्पा...

- संदीप खरे

चंद्रमोहन कुलकर्णी हे ‘अप्लाईड आर्ट’मधलं एक ‘दादा’ नांव; अनेक मान्यवर प्रकाशनसंस्थांच्या दर्जेदार साहित्यकृतींना तितकंच तोलामोलाचं दृश्य रूप देणारं! व्यावसायिकतेतही कलेची ‘अभिजातता’ जपणाऱ्या त्यांच्या कुंचल्यांनी वेगवेगळ्या शैलीची अनेक रूपं आपल्या समोर ठेवली आहेत. या चित्रांतून त्यांची माध्यमावरची पकड तर लक्षात येतेच, पण त्याहून जाणवते ती त्यांची संवेदनशीलता! एखाद्या विषयाकडे आरपार पाहू शकणारी दृष्टी! कसबी हात आणि अशी तरल दृष्टी यांचा एकोपा तसा दुर्मिळच!

केवळ स्वानंदासाठी केलेल्या त्यांच्या चित्रमालिकांची एकूण तीन प्रदर्शने, दिनांक १४ फेब्रुवारी २००५ ते २८ फेब्रुवारी २००५ पर्यंत पुण्यातील ‘इंडिया आर्ट गॅलरी’ येथे आपणास पहावयास मिळणार आहेत. ‘चाइल्डहूड लॉस्ट’, ‘प्रकृति-पुरुष’ आणि ‘ट्रॅजेडी कॉल्ड लव्ह’ ह्या तीन विषयांचा समावेश ह्या तीन प्रदर्शनांतून असणार आहे!

ही चित्रे जेव्हा प्रथम समोर आली, तेव्हा माझ्याशी ती जी काही बोलली ते तुम्हाला सांगण्यासाठीच हा लेखप्रपंच! वास्तविक चित्रांशी माझा संबंध केवळ एक ‘बघ्या’ म्हणूनच! इंटरमिजिएट ‘ए’ ग्रेड आणि अधूनमधून स्वानंदासाठी केलेली रेखाटने एवढीच तुटपुंजी कामगिरी! पण चित्र बघायला मात्र नेहमीच आवडत आलेली. मुळात चित्र ‘बघणे’, त्यांचं म्हणणं ऐकून घेणे, त्यांच्याशी संवाद साधणे हीच एक कला असते. असं मला वाटतं. चित्र एकच पण बघणाऱ्या प्रत्येक माणसागणिक वेगवेगळ्या अर्थांचे अलंकार लेवून हे चित्र काही सांगत राहतं! ही शक्ती एखाद्या अस्सल कवितेसारखीच! साहजिकच ही चित्र जेव्हा मी पाहिली तेव्हा त्यांचे अर्थ माझ्या जगण्यानुसार, समजुतीनुसार आकार धारण करून माझ्या समोर आले.

यातली पहिली मालिका आहे - ‘चाइल्डहूड लॉस्ट’! निरागसतेची पहिली वर्षे सरून तारुण्याच्या उंबरठ्यावर पाय ठेऊ बघणाऱ्या एका कुमारिकेच्या मनातली थरथर यातील चार चित्रांतून जाणवते. खूप संमिश्र भावना या मुलीच्या मनात उसळतायत. बालपण हरवल्याचं दु:ख आणि येणाऱ्या तारुण्याचं स्वागत, त्याच्या अपेक्षा, त्याविषयीची हुरहुर हे सारं एकवटून आलंय खरं; पण याचंही आकलन व्हावं असं वयच नाहीय तिचं! ही अस्वस्थता, कातरता नक्की कसली हे तिलाही कळलेलं नाहीये कदाचित... पण ह्या अस्वस्थतेनी तिच्या अस्तित्वावर छाप सोडलाय एवढं मात्र खरं! हा छाप, हा ठसा तिच्या अवघ्या देहबोलीवर उमलाय.... काही ‘विचार’ करू पाहणारं तिचं अजाण वय किंचित पोक्त आकृती धारण करून बसलंय.

काही तरी हरवलंय... आता काही काही गोष्टी केलेल्या आईला आवडत नाहीत आणि काही काही गोष्टी आता स्वत:लाच कराव्याशा वाटत नाहीत! मुसळधशर पाऊस येतो तेव्हा आता होड्या नाही कराव्याशा वाटत... तर मनात नुकतंच अंकुरलेलं हिरवंकंच पिंपळ पान त्या निथळत्या पावसात अलगद धरावं असं वाटतं... त्या गार थेंबांना झेलताना सगळी काया बरेच वर्षांपासून आसूसलेल्या तृषार्त धरतीचं रूप घेत्येय... हे असं का होतंय? हे नक्की काय होतंय?

आता जरा ‘उठता बसताना’ सावरून वावरावं लागतंय... कालपर्यंत अंगाशी नि:संकोचपणे झोंबाझोंबी खेळणाऱ्या सवंगड्यांच्या नजरा काही नवीनच कुतुहलानी पाहतायत... आता सरळ फतकल मारून सागरगोट्यांचा डाव मांडता येत नाही (आणि मांडावासा वाटत नाही)... फुलपाखरांच्या मागे धशवताना काल-परवापर्यंत वारा होणारे पाय, आता तितके ओढाळ, भानवेडे राहिलेले नाहीत... होणारे वा केले जाणारे स्पर्श आता तितके मनमोकळे राहिलेले नाहीत... हे काय होतंय नक्की? हे मला आवडतंय? मग ही हुरहुर कसली? बालपणाचे कवडसे हरवल्याचे दु:ख म्हणावं, तर कुठल्यातरी झगझगत्या प्रकाशाची ही ओढ कसली?

बावरल्येय बिचारी! घरात... बाहेर वावरताना तिला न शोभाऱ्या पोक्तपणाने विचार करत राहिल्येय... निळ्या नदीच्या शेजारी बसून संथपणे पाहत्येय ती पाण्याबरोबर दूर दूर चाललेली होडी... आता त्या नदीच्या लाटांत पाय बुडवून खेळ नाही मांडावासा वाटत... वाटतं जरा शांत बसावं या खडकावर... आभाळ पाण्याचा रंग कसा एक होऊन उतरून आलाय सभोवताली... ही निळाई शांततेचीही आहे आणि कसल्यातरी अलवार व्यथेची ‘सिंफनी’ छेडणाऱ्या सांद्र सुरांचीही आहे! त्या दूर दूर जाणाऱ्या होडीला बालपणाची उपमा द्यावी, इतकं कुठे मोठं अजून तुझं वय? पर तुझ्या मनातल्या अस्वस्थतेचं निळं गाणं, लाटांच्या लपलप स्वरांसहीत ऐकू येतंय मला...

आणि आता झोपाळ्यावर बसल्येय, ती ही कशी? आईनी पाहिलं तर म्हणेल कालपर्यंत मैत्रिणींना जमवून झोपाळ्यावर धिंगाणा घालणारी हीच का ती माझी पोर? आणि तुझं तर लक्षच नाहीये बिलकुल... झोपाळ्यावर बसल्येय खरी पण झोका घ्यायचं भान कुठंय?